 ISSN:2249-6661
Vol-43 No.-04 (XIII) October-December (2020)

# भारतातील लिंगभाव समानतेचे वास्तव

प्रा. एच. टी. वाघमारे
के.के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान वसंगणक विज्ञान महाविद्यालय चांदोरी, ता. निफाड जि. नाशिक
hanmant52@gmail.com

**गोषवारा:**

भारतात स्वातंत्र्यापूर्वी पासूनचस्त्रियांच्या शोषणाच्या आणि दुय्यमत्वाच्या विरोधात चळवळी व कार्य करण्याची सुरुवात झाली. स्वातंत्र्यानंतर संविधानाद्वारेचलिंगभाव समानतेचे तत्व स्वीकारण्यात आले.स्त्री-पुरुष यांच्यातील सर्वप्रकारचे भेदभाव व विषमताकालबाह्य ठरविण्यात आले.हे समानतेचे तत्वपत्यक्ष व्यवहारात येण्यासाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिकसंरचनेत जो बदल करण्याचीगरज होती ती केली नसल्यामुळे स्त्री-पुरुषसमानता निर्माण होऊ शकलीनही. पितृसत्ताकसरंजामशाही, भांडवलशाहीया स्त्रीशोषक व्यवस्थातशाच टिकून राहिल्यामुळेस्त्रीयांच्याशोषणाला हातभारच लागला.लोकशाही स्वीकारून जनतेचे राज्य जरी निर्माण केले असले तरी या लोकशाहीत जनसंख्येनेनिम्म्या असलेल्या स्त्रियांना दुय्यम दर्जा मिळत आला आहे.दिवसागणिकत्यांच्यावर विविध प्रकारचे अत्याचार होत आहेत.जागतिकीकरणाच्या आगमनानंतर काही क्षेत्र खुलेजरी झाले असले तरी स्त्रियांचे शोषण वाढले आहे.आणि त्याचे स्वरूपही बदलले आहे.भारतातलिंगभावसमानता निर्माण करण्यासाठीसामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिकसंरचनेत आणि मानसिकतेत अमुलाग्र परिवर्तनाची गरज आहे.

**बीज संकल्पना:** लिंगभाव, समानता, जागतिकीकरण

**प्रस्तावना:**

समाजाच्या अस्तित्वासाठी आणि सातत्यासाठीस्त्रीव पुरुषहे दोन्ही घटक अनिवार्य आहेत. सामाजीची प्रगीती ही या दोन्ही घटकांच्या प्रगतीवर अवलंबून आहे.खऱ्या अर्थाने समाजविकास व्हायचा असेल तरया दोन्ही घटकांचासमान पातळीवर विकास होणे गरजेचे आहे.पणप्राचीन काळापासूनपुरुषांनी स्त्रियांवर आपले वर्चस्व निर्माण करूनत्यांना गुलाम केले.सर्व क्षेत्रावर आपलेप्रभुत्व टिकून राहण्यासाठी पितृसत्तेला पोषक असणारीसामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिकव्यवस्था निर्माण केली. प्रबोधणाची चळवळ, फ्रेंचराज्य क्रांती यातून झालेल्यावैचारिकपरिवर्तनातूनउदयासआलेल्यास्वातंत्र्य, समानता, बंधुता यामानवीमूल्यांमुळे स्त्रियांना अधिकारांची जाणीव झाली आणिस्त्रियांच्या अधिकारांच्या चळवळी उदयास आल्या.

भारतात प्रबोधनाच्या आगमनाने उपरोक्तमानवी मुल्यांची जाणीव झाली आणि स्त्रियांच्यागुलामिविरुद्ध व शोषणाविरुद्ध विचार व चळवळी निर्माण झाल्या.त्यासाठीअनेक विभूतींनी जोरकसपणे प्रयत्न केले.स्त्री-पुरुष यांच्यात प्रचलितअसलेलेसर्व प्रकारचे भेदभाव नाकारूनसंविधानाद्वारे लिंगभाव समानता प्रस्तापित करण्यात आली.पुरुष्यांच्या बरोबरीने स्त्रियांना सर्व अधिकार देण्यात आले. त्यांचे अत्याचारापासून व शोषणापासून संरक्षण होण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. तरीपणसमाजातस्त्री-पुरुष समानता निर्माण होऊ शकलीनही. आजहीलिंगभावाधारितभेदभाव केला जातो, विविध प्रकारे शोषण केले जाते.जागतिकीकरणाच्या आगमनाने काही बाबतीत खुलेपणाजरी वाटत असला तरी स्त्रियांच्या शोषणात आणि अत्याचारातवाढ होताना दिसत आहे.याशोधनिबंधात स्त्री-पुरुष समानतेबाबतभारतात झालेले प्रयत्न वघटनात्मकआणिकायदेशीरबाबींचा थोडक्यात आढावा घेऊनस्त्रियांच्या दुय्यामत्वाची व भेदभावाची कारणमीमांसा करण्याचा, त्यांच्या शोषणाचे स्वरूप स्पष्ठ करून काही उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश:**

१) भारतातलिंगभाव समानतेसाठी झालेल्या प्रयत्नाचा आढावा घेणे.
२) स्त्रियाविषयीच्या घटनात्मक व कायदेशीर तरतुदींचाआढावा घेणे.
३) स्त्रियाविषयीच्या वास्तवपरिस्थितीचा आढावा घेऊनउपाय सुचविण्याचा प्रयत्न करणे.

**गृहितकृत्य:**

१) भारतीयसामाजातलिंगभावाधारितविषमता प्रचलित असूनतीदूर होणे गरजेचे आहे.
२) लिंगभावसमानता प्रस्तापित करण्यासाठीघटनात्मक व कायदेशीर तरतुदी भक्कमअसूनही स्त्री-पुरुष समानता प्रस्तापित होऊशकलीनही.
३) स्त्री-पुरुष समानता प्रस्तापित होण्यासाठीअमुलाग्र परिवर्तनाची गरज आहे.

Copyright © 2020 Authors 

**संशोधन पद्धती:**

सदरसंशोधनासाठी मानसशास्त्रीय, ऐतिहासिक, विश्लेषनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेचतथ्यसंकलनासाठीदुय्यमसाधनांचा उपयोग करण्यात आला आहे.त्यात संदर्भग्रंथ, विविध अहवाल, नियतकालिके, वर्तमानपत्रे यांचाही वापर करण्यात आला आहे.

**लिंगभावसमानता:** इंग्रजीतील‘Gender’ या शब्दाचा मराठीत ‘लिंग’ असा अर्थ आहे.पण सामाजिक परिप्रेक्ष्यात ‘लिंगभाव’ असा अर्थ घेतला जातो.त्यालाविशिष्ट अर्थ आहे. ‘स्त्रीपुरुषांचेस्थान व भूमिका यात सामाजात कसा भेद केला जातो, याचे या संज्ञेमुळेआकलन होते. म्हणजेच‘स्त्रीपुरुषांसंबंधीच्या सामाजिक वास्तवाचे आकलन होण्यासाठी विश्लेषणाचे एक साधन म्हणून हीसंकल्पनावापरली जाते.’स्त्रियांचेदुय्यमत्व हेत्यांच्याशरीररचनेतचआहे, तिच्या भूमिका, दर्जाजैविक वेगळेपणामुळे ठरतात, म्हणून ते नैसर्गिक आहे. असे मानले जाते तेव्हा त्याच्या कारणमीमांसेचा प्रश्न उरत नाही.असासमाजमानस चालत आलेला आहे.याविचारला प्रतिवाद करण्यासाठी लिंगभाव ही संकल्पना वापरली जाते.यासंकाल्पानेद्वारे ‘लिंग’ आणि‘लिंगभाव’ यात फरक केला जातो. लिंगही नैसर्गिक बाब आहे. ती अपरिवर्तनीय आहे. पणया जैविक वेगळेपणावरून स्त्रियांना जीदुय्यमत्वाचीवागणूक दिली जाते,तिचे विविध प्रकारे शोषण केले जाते,ते मात्र अनैसर्गिक,मानवनिर्मित तसेचसांस्कृतिक व ऐतिहासिक आहे, हेस्पष्ट करण्यासाठी या संकल्पनेचा सैद्धांतिक वापर केला जातो.

**‘लिंग:**लिंग हे नैसर्गिक असते. लिंग हे जीवशास्त्रीय आहे.तेस्त्रीपुरुषांच्या जननेंन्द्रीयातील फरकामुळे दृश्य स्वरूपाचे आहे. लिंगातील भेद हे प्रजनन प्रक्रियेतील कार्यावर अवलंबून आहेत. लिंग हे शक्यतो सहजपणे बदलता येत नाही. लिंग हे सर्वत्र सारखे आसते. म्हणजेच ते स्थिर आहे.’

**‘लिंगभाव:**लिंगभाव हा सांस्कृतिक असून मनुष्यनिर्मित आहे.लिंगभाव हा सामाजिकसांस्कृतिक असतो. तो भूमिका, गुण, वर्तनप्रकार व जबाबदाऱ्या इत्यादिंचीस्त्रीयोचित आणि पुरुषोचितअशी विभागणी करतो. लिंगभाव बदलता असतो. काळ, संस्कृतीइतकेच काय कुटुंबा-कुटुंबाततोबदलतो. म्हणजेचलिंगभाव बदलता येतो.’ मुलजन्माला आल्यानंतर स्त्रीपानाचे किवा पुरुषपानाचे संस्कार केले जातात. त्यांचेवर्तन कसे असावे, कपडे कसे असावेत, काय करावे व काय करूनये, त्यांच्याभुमका, जबाबदाऱ्या, सामाजिकक्षेत्रातील वर्तन याचे मुलगा व मुलगी यांच्यावर वेगवेगळे संस्कार केले जातात. यातूनचबाईपण व पुरुषपण घडविले जाते.यात स्थळ, काळ,परिस्थितीवरून भिन्नातही दिसून येते.म्हणूनबाईपणवपुरुषपणहे नैसर्गिक नसूनघडविलेले आहे.

**लिंगभावसमानता प्रस्तापित करण्यासाठी झालेले प्रयत्न:**भारतातप्राचीन काळापासून परंपरेने चालत आलेल्या स्त्री-पुरुषातील भेदभावाला नाकारून लिंगभाव समानताप्रस्तापित करण्यात आली आहे. यासाठीचे प्रयत्न स्वातंत्र्यापूर्वी पासूनचसुरु झाले होते.

**स्वातंत्र्यपूर्वझालेले प्रयत्न:**भारतातस्वातंत्र्यापूर्वी झालेले प्रयत्न प्रामुख्याने परंपरेने चालत आलेल्याअमानवी रूढी, प्रथा, परंपरामधून मुक्त करण्यासाठी आणिस्त्रीयांनासामाजिक प्रवेश मिळवून देण्यासाठी झालेलेदिसून येतात.या प्रयत्नाची सुरुवात सती प्रथेला विरोध करण्यापासून झाली.धर्मांधाकडूनया प्रथेचे उदात्तीकरण केले जात होते.‘मध्ययुगात सर्वप्रथम ही प्रथा बंद करण्याचा प्रयत्नअकबर बादशहा यांनी केला.’पण हेप्रयत्नअयशस्वी ठरले. सन १८२३ साली कंपनी सरकारचे अधिकारी लॉर्ड बेटिंक यांनी केले. त्याला राजाराम मोहन रॉय यांनी पाठिंबादिला व या प्रथेविरुद्ध जोरकस प्रचार केला. शेवटी ही प्रथा बंद झाली. ‘लॉर्ड बेटिंक यांनी मुलींची बालहत्या व स्त्रियांचा व्यापार या प्रथाही बंदकेल्या.’राजाराम मोहन रॉय,बाळशास्त्रीजांभेकर,लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित,पंडिता रमाबाईमहात्मा फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, शाहू महाराजन्या. रानडे,गोखले,ईश्वरचंद्र विद्यासागर, महर्षी कर्वे, शाशिपदबेनार्जी, बेहरामजी मलबारी या व अशा अनेक समाजसुधारकांनीस्त्रियांच्या मुक्तीसाठी मुलभूत असे कार्य केले. राष्ट्रीय कॉंग्रेसनेहीस्त्रियांना पक्षात स्थान देले. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याचळवळीतस्त्रियांचा सहभाग मोठा होता.परिणामीतत्कालीनब्रिटीश सरकारला अनेक महत्वपूर्ण कायदे करावे लागले.त्यात सतीबंदीकायदा – १८२९, विधवापुनर्विवाहकायदा –१८५६,धर्मांतरीतव्यक्तीविवाहविच्छेदकायदा – १८६६, भारतीयघटस्फोटकायदा –१८६९, आनंदीविवाहकायदा – १९०९,वैद्यकीवगर्भपातकायदा –१९२९ हुंडाप्रतिबंधककायदा – १९२९, बालविवाहनिर्बंधकायदा – १९२९ या कायद्यांचा समावेश करता येईल.

**घटनात्मकव कायदेशीर तरतुदी:**भारतातस्वातंत्र्यापूर्वी स्त्रियांच्या मुक्तीसाठी झालेल्याप्रयत्नामुळेस्त्रियांबाबत बरेच सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते. म्हणूनघटनेद्वारे लिंगभावसमानतेचे

Copyright © 2020 Authors 

तत्व स्वीकारून सर्व प्रकारची स्त्री-पुरुष विषमता कालबाह्य ठरविण्यात आली. भारतीयराज्याघतनेतील मुलभूत हक्क व राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे या भागातस्त्री-पुरुषसमानतेबाबतमहत्त्वपूर्णतरतुदीकरण्यातआलेल्याआहेत.भारतीयसंविधानातील सर्वमुलभूत हक्क हेसर्वस्त्री-पुरुषांनाकसल्याही भेदभावाशिवाय बहाल करण्यात आले आहेत.नागरिककिंवा व्यक्ती असा उल्लेखजेव्हायेतो तेव्हा त्यात स्त्री व पुरुष समाविष्ट असतात.या दृष्टीने **समतेचा हक्क**विशेष महत्वाचा आहे.अनुच्छेद१४मध्ये सर्वव्यक्तींनाकायद्यापुढेसमानताआणि कायद्याचेसमानसंरक्षण असेल असेनमूद केले आहे. अनुच्छेद१५(१) नुसार राज्य धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थानया किंवा यापैकी कोणत्याही करणावरुन भेदभाव करणारनाही,अनुच्छेद१५(३) मध्येराज्यासस्त्रियाआणिबालकांसाठीविशेषतरतूदी करता येतीलअसेनमूद केले आहे.अनुच्छेद१६(१) मध्येराज्याच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक सेवांमध्ये समान संधी असेल. अनुच्छेद१६(२)नुसार याबाबत सेवायोजन, पदनियुक्ती, नोकरीयामध्येधर्म, वंश, जात, लिंग,जन्मस्थानवा वास्तव्य या किंवा यापैकी कोणत्याही करणाधारे व्यक्तींमध्ये भेदभाव केला जाणारनाही वातिला अपात्र ठरविलेजाणारनाही.अनुच्छेद १९ ते२२मधील**स्वातंत्र्याचा अधिकार** सर्व स्त्री-पुरुषांनादेण्यात आलेला आहे.भाषणस्वातंत्र्य, अभिव्यक्तीस्वातंत्र्य, शांततेनेवविनाशस्त्रएकत्रजमण्याचेस्वातंत्र्य, संघटनाबनविण्याचेस्वातंत्र्य, भारताच्याकुठल्याहीक्षेत्रातमुक्तपणेसंचारकरण्याचे, राहण्याचेवस्थायिकहोण्याचेस्वातंत्र्य समाविष्ट आहे. तसेचपिळवणूकी विरुद्धचाहक्क (२३आणि २४), धार्मिकस्वातंत्र्याचाहक्क (२५ ते२८), सांस्कृतिकवशैक्षणीकहक्क (२९ ते३०),संवैधानिकउपाययोजनाचा हक्क (३२) हे सर्वहक्कस्त्री व पुरुषांनादेण्यात आले आहेत.

मुलभूत हक्काबरोबरच **राज्याच्या धोरणाचीमार्गदर्शक तत्वे**यामध्येहीमध्ये स्त्री व पुरुष समानते विषयी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. अनुच्छेद३९(a)मध्येस्त्रीवपुरुषनागरिकांना उपजीविकेचे पुरेसेसाधनप्राप्त करण्याचा हक्क असावा. (d)स्त्रीवपुरुषदोघांनासमान कामासाठी समानवेतन मिळावे. (e)कामगार, पुरुष, स्त्रिया यांचे आरोग्यआणिक्षमतातसेच बालकांचे नाजूक वय याचा गैरवापर प्रतिबंधित करणेआणि आर्थिक गरजेपोटी नागरिकांना आपले वय व क्षमतेस विपरीत काम करण्याची सक्ती केली जाणार नाही.अनुच्छेद४२मध्ये कामगारांनाकामाच्याठिकाणीन्याय आणि मानवी वातावरणाची हमी द्यावी.तसेच स्त्रियांना मातृत्व (प्रसुतीविषयक) साहाय्य मिळवून देण्यासाठी तरतूद करावी. अशा तरतुदी मार्गदर्शकतत्वात करण्यात आल्या आहेत.अनुच्छेद५१(a) मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या **मुलभूत कर्तव्यातील**पाचव्या कर्तव्यात धर्म, भाषा, प्रदेश, वर्ग वगैरे भेद विसरून अखिल भारतीय जनतेत एकोपा व बंधुभाव वाढीस लावणे; स्त्रियांच्याप्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे.अशा घटनात्मक तरतुदी भारतीय राज्यघटनेत करण्यात आलेल्या असून त्याची अंमलबजावणीप्रभावीपणे होण्यासाठी अनेक कायदेही करण्यात आले आहे. घटनात्मक आणि कायदेशीर दृष्टीने स्त्री व पुरुष यांच्यात कसल्याही प्रकारचा भेद ठेवण्यात आला नाही.

**स्त्रियांविषयीचे कायदे:**

वरीलघटनात्मक तरतुदी बरोबरचगरजेनुसार अनेककायदेकरण्यात आले आहेत. शोधनिबंधाच्याशब्दमर्यादेचा विचार करता सर्व कायद्याचे विश्लेषण न करता येथेफक्त उल्लेख करणार आहे.स्वातंत्र्यापूर्वी करण्यात आलेल्या कायद्याचा उल्लेख वर केला आहे. येथे पुनरावृत्ती नको.कर्मचारीविमायोजना – १९५२,विशेषविवाह – १९५४,हिंदूविवाहकायदा –१९५५, हिंदूदत्तकवनिर्वाहकायदा – १९५६,अनैतिकदेहव्यापारप्रतिबंधककायदा– १९५६, विवाहितस्त्रीयांचासंपत्तीचाकायदा – १९५९,भिक्षाप्रतिबंधककायदा – १९५९, अनाथालयवधर्मादायकायदा – १९६०, प्रसूतीसुधारणाकायदा – १९६१, मातृत्वलाभासंबंधीचाकायदा – १९६१, समानवेतनकायदा – १९७६,कुटुंबन्यायालयकायदा – १९८४,वेश्यावृत्तीनिवारणकायदा – १९८६, हुंडानिषेधकायदा– १९८६,मुस्लीमस्त्रीघटस्फोटहक्कसंरक्षणकायदा – १९८६, मानसिकआरोग्यकायदा –१९८७, राष्ट्रीयमहिलाआयोगकायदा –१९९०, मानवीहक्कसंरक्षणकायदा – १९९३, अपंगव्यक्तीकायदा –१९९५, कौटुंबिकहिंसाचारप्रतिबंधक कायदा –२००५, महाराष्ट्रदेवदासीप्रतिबंधकवनिर्मूलनकायदा – २००५, बालन्याय (मुलांचीकाळजीवसंरक्षण) सुधारितअधिनियम२००६,लैंगिकअत्याचारापासूनबालकांचेसंरक्षणअधिनियम२०१२,कामाच्याठिकाणीमहिलांचालैं गिकछळ (प्रतिबंध, मनाईवनिवारण) अधिनियम२०१३. या कायद्याबरोबरच शासनाकडूनअनेक योजनाही अमलात आणल्या आहेत. दरवर्षी अनेक नवीन योजना अमलात आणल्या जातात.

Copyright © 2020 Authors 

**महिलांची सद्य स्थिती:**

वरीलघटनात्मक आणि कायदेशीर तरतुदीअभ्यासल्यानंतरभारतातखरेच लिंगभाव समानता निर्माण झाली का? घटनेच्याअंमलबजावणी नंतर सत्तर वर्षाच्या काळात आपण कितीप्रमाणात लिंगभाव समानता निर्माण करू शकलो? याचा आढावा घेणे गरजेचे आहे. यातूनच वास्तव परिस्थितीचे आकलन होईल.

लिंगभाव समानतेच्या तत्वामुळे महिलांनापुरुषांच्या बरोबरीने विविध क्षेत्रात प्रगीती करण्याची संधी मिळाली. त्यामुळे त्या विविधक्षेत्रातसक्षमपाणेकार्य करताना दिसत आहेत.या सत्तर वर्षाच्या काळात ज्या ज्या क्षेत्रात स्त्रियांना संधी मिळाली त्या क्षेत्रात त्यांनी महत्वपूर्ण कामगिरी केल्याचे दिसून येते. समाजकार्यापासून ते माहिती तंत्रज्ञान आणि अंतरीक्ष क्षेत्रापर्यंतसर्वच क्षेत्रात महिला दिसत आहेत.हे प्रगतीचे लक्षण निश्चितच आहे.सन १९५१मध्ये लिंगभाव समानतेबाबत महिलांची परिस्थिती चिंताजनकहोती. महिलांचे साक्षरतेचे प्रमाण केवळ ८.८६% होते. लोकसभेतील स्त्रीयांचासहभाग केवळ ४.४ % होता. सन १९६२ मध्ये पुरुष मतदान प्रमाण६३.३% तर महिला मतदानप्रमाण४६.६% होते. दोन्हीतील फरक १६.७% होता.आता या परिस्थितीत बरिच प्रगती झाली असून सन २०११च्या जनगणने नुसारमहिलांचे साक्षरतेचे प्रमाण केवळ ६५% एवढे वाढले आहे. लोकसभेतील प्रतिनिधित्वात वाढ होऊन २०१४मध्ये११.२ % एवढा तर२०१९मध्ये २७% एवढी वाढ झाली आहे. तर मतदानाचे प्रमाण २०१४च्या निवडणुकीत ६५.५% म्हणजे जवळपास पुरुषांच्याबरोबर आले आहे.स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रीयांसाठी५०% आरक्षणाची तरतूद केल्यामुळे तेथे निम्मे प्रतिनिधित्व स्त्रीया करत आहेत.महिलांचेश्रमातील भागीदारीचे प्रमाण वाढतअसूनसन २०१७-१८ च्या अहवालानुसार शहरी भागातील महिलांचे हे प्रमाण५२.१% म्हणजेपुरुषांपेक्षा (४५.७%)जास्त झाले आहे. यावरूनमहिलांचा देशाच्या विकासातील सहभाग आणि योगदान दिसून येते.

वरील परिस्थिती जरी आशादायक दिसत असली तरी काही बाबतीत मात्र गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.संख्येने जवळपास निम्म्या असणाऱ्या महिलांचे राजकीय सहभागाचे प्रमाणही त्याच प्रमाणात असणे गरजेचे आहे. पण लोकसभेतीलप्रतिनिधित्वाचेप्रमाण२०१४च्यासार्वत्रिक निवडणुकीपर्यंत केवळ११.२% होते.२०१९च्यासार्वत्रिक निवडणुकीत ते २७%पर्यंत गेले आहे.घटक राज्यातील चित्र यापेक्षा फार वेगळे नाही.सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जेराजकीय पक्ष भाग घेतात ते सर्व पुरुष वर्चस्व असलेले आहेत.पितृसत्ताक संस्कृतीने प्रेरित आहेत.त्यामुळेया पक्षाद्वारे महिलांना योग्य प्रतीनिधात्व मिळत नाही. योग्यप्रतीनिधात्व मिळण्यासाठी स्वतंत्र आरक्षणाची गरज होती. पण३३%आरक्षणाचे विधेयक अजून मंजूर होऊ शकले नाही. महिलांचे प्रश्न घेऊन निवडणूक लढविणाराएकहीराजकीय पक्ष नाही. त्यानुळेमहिलांचे प्रश्नदुर्लक्षिलेजातात.प्रत्येक राज्यातील निवडणुकीआधी आणि नंतर अशी गुन्ह्याची तुलना केली असता ज्या पंचायतराज निवडणुकीत महिला मोठ्या संख्येने निवडून आल्या होत्यातेथे राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या वार्षिकी आकडेवारी नुसार असे दिसून आले की निवडणुकीनंतर महिलावरील गुन्ह्याची संख्या २६%नीवाढली.बलात्कार प्रकरणात ११% तरअपहरण १२%नी वाढले. स्थानिकस्वराज्य संस्थामध्येमहिलांना ५०% आरक्षण देऊनही त्यांच्यावरील होत असलेल्या अत्याचारकमी न होता वाढताना दिसत आहेत. लिंगभाव समानता प्रस्तापित होण्यासाठी स्त्रियांनासामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रातनिर्भयपणे, स्वाभिमानाणे, प्रतिष्ठेनेसमान सहभाग मिळणे अपेक्षित होते.लिंगभाव समानतेची संस्कृती निर्माण होणे आवश्यक होते पणतसे न झाल्याने महिलांना दुय्यम समजून त्यांच्यावर अन्याय, अत्याचार केले जातात.

संयुक्त राष्ट्र संघाच्या २०१९च्यालैंगिकअसमानता निर्देशांक अहवालानुसार १२९ देशाच्या सूचीमध्ये भारताचा ९५ क्रमांक असून घाना, रवांडा, भूतानया देशापेक्षाही भारताची वाईट स्थितीआहे.जागतिकीकरणाच्या आगमनाने काही प्रगतीचे नवेक्षेत्र उपलब्ध झाले असले तरीमहिलांची असुरक्षितताव त्यांच्यावर होणारे अत्याचारचे प्रमाण यातवाढ झालेली दिसते.भारतातमहिलांवर होणारे अत्याचारचे प्रमाण व स्वरूप पुढीलआकडेवारीवरूनअधिक स्पष्ठ होईल.पुढील सर्व आकडेवारीजागतिकीकरणाच्या आगमनानंतरची आहे.

गुन्ह्याचे प्रकारानुसार भारतीय महिलावरील हिंसाचाराच्या घटना

| गुन्ह्याचा प्रकार | २००१ | २००५ | २०१० |
|---|---|---|---|
| बलात्कार | १६०७५ | १८३५९ | २२१७२ |
| अपहरण | १४६४५ | १५७५० | २९७९५ |

Copyright © 2020 Authors 

| | | | |
|---|---|---|---|
| हुंड्यासाठी मृत्यू | ६८५१ | ६७८७ | ८३९१ |
| कौटुंबिकछळ | ४९१७० | ५८३१९ | ९४०४१ |
| विनयभंग | ३४१४२ | ३४१७५ | ४०६१३ |
| लैंगिकछळ | ९७४६ | ९९८४ | ९९६१ |
| मुलींची आयात | ११४ | १४९ | ३६ |
| अनैतिक व्यवहार इरातीबंध कायदा | ८७९६ | ५९०८ | |
| अयोग्य महिला प्रदर्शन बंदीकायदा | १०५२ | २९१७ | ८५७६ |
| | | | |
| हुंडाबंदी कायदा | ३२२२ | ३२०४ | |
| सती दांडी कायदा | ०० | ०० | |
| एकूण | १४३७९५ | १५५५५३ | २१३५८५ |

*स्त्रोतः सांख्यिकीयव कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार*

सन २००१मध्ये महिलांवरील अपराधाची नोंद१,४३,७९५सन२००५मध्ये१,५५,५५३ तर २०१०मध्ये २,१३,५८५ अशी झाली असून ती सतत वाढतगेलेली दिसते.राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरो च्या अहवालानुसार सन २०१५मध्ये महिलाविरुद्ध गुन्ह्याची संख्या ३२,९२,४३ एवढी होती. तीसन २०१६मध्ये ३३,८९,५४ एवढी वाढलीतरसन २०१७मध्ये ३५,९८,५९ एवढी वाढली. महिला संरक्षणाचे कायदे कठोर करूनही त्याचा उपयोग होताना दिसत नाही. दरवर्षीअपराधात वाढ होत आहेत.

जनगनणा २०११ नुसार भारतात१००० पुरुषामागे ९४०स्त्रिया आहेत. हेच प्रमाण केरळमध्ये १०४८ (पुरुषापेक्षाजास्त), महाराष्ट्रात ९९६ तर दिल्लीत८६८(सर्वात कमी)असे आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे गर्भलिंग चिकित्साशक्य झाल्यामुळे मुलीचा जन्माआधीच बळी दिलाजातो.विशेषम्हणजे ही प्रवृत्तीशिक्षित समाजात जास्त आहे.मुलगी जन्मल्याने दुःखी होणारी व मुलगा झाल्याने आनंदोत्सव साजरा करणारीप्रवृत्तीस्वतःला सुशिक्षित समजणाऱ्या समाजात दिसते.

**लिंगभावअसमानतेची कारणमीमांसा:**

संविधान कर्त्यांनीफार विचारपूर्वक संविधानाद्वारे लिंगभाव समानता निर्माण केली पण त्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी होऊ शकली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीसंविधान सभेतकेवळ राजकीय समानता प्रस्तापित करून भागणार नाही तर सामाजिक व आर्थिक समानता प्रस्तापित करावे लागेल असा इशारा दिला होता.हाइशारास्त्री-पुरुष यांच्यातीलविषमतेलाही लागू होतो.त्याकडे दुर्लक्ष केले गेले. स्वातंत्र्य, समता, बंधुतेवर आधारित लोकशाहीचास्वीकार भारताने केला पण तीमुल्ये समाजात रुजले नाहीत. येथीलमहिलांचे शोषण अनेक पदरी आहे.पितृसत्ता, जातीव्यवस्था, धर्म या सर्व व्यवस्था विविध मार्गाने शोषण करत असतात.मागासवर्गीय महिलांचे शोषण तरजास्तच भयावह आहे.लिंगभाव समानता प्रस्तापित होण्यातमोठा अडथळा असलेली पितृसत्ता जोपासली गेली. स्त्रीने पुरुषाच्या इच्छेनुसार वर्तन करावे असा आग्रह धरला जातो.एकंदरीत सर्व व्यवस्था पुरुषप्रधान, जातीप्रधान वधर्माधिष्ठित असून तीस्त्री-पुरुष विषमतेला पोषक ठरत आहे.

**उपाययोजना:**

लिंगभाव समानताप्रस्तापित होण्यासाठीसंविधानिक व कायदेशीर तरतुदींचे काटेकोर पालन होणे गरजेचे आहे. लोकशाही मूल्यांच्या विरुद्ध प्रचलित असलेल्या व्यवस्था संपुष्टात येणेगरजेचे आहे.सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक,सांस्कृतिक, धार्मिक, व्यावसायीक अशा सर्वच क्षेत्रात महिलांना समान प्रतीनिधात्व देणेगरजेचे आहे.पुरुषांचामहिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. महिला पुरुषाप्रमाणेच माणूस असून मला जेवढे अधिकार आहेत तेवढेचतिलाही आहेत, तिचे अधिकार हिराउनघेण्याचामला अधिकार नाही,ही जाणीव पुरुषात निर्माण होणे गरजेचे आहे. महिलांना मानवी अधिकारांची जाणीव निर्माण करून देणेगरजेचे आहे. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करून कुटुंबातून त्यांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे.महिलावर अत्याचार करणाऱ्यावर कठोर कारवाई होणेगरजेचे आहे.

ISSN:2249-6661
Vol-43 No.-04 (XIII) October-December (2020)

**सरांसः**

भारतातघटनेद्वारे लिंगभाव समानता प्रस्तापित करण्यात आलेली असली तरी प्रत्यक्षात मात्रलैंगिक भेदभाव मोठ्या प्रमाणावर केला जातो. महिलांना समान प्रतीनिधात्व तर मिळत नाहीच पणत्यांच्यावरमोठ्याप्रमाणावर अत्याचार केले जातात हे वरील आकडेवारीवरूनसमजते.लिंगभाव समानताप्रस्तापित करण्यासाठी अजून फार मोठा पल्ला गाठावयाचा आहे. त्यासाठी पुरुषप्रधानतेवरआधारलेल्या या प्रचलित वैचारिक, मानसिक, सांस्कृतिक, सामाजिक व्यवस्थेत अमुलाग्र परिवर्तन होण्याची गरज आहे.

**संदर्भः**

*१) प्रा. व्ही. के. जाधव, आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर.*
*२) कमला भासीर, लिंगभाव समजून घेताना, लोकवांङमयगृह, मुंबई*
*३) जीवनमार्गविशेषांक, भारतीय स्वातंत्र्याची ६१ वर्ष, ऑगस्ट २००८.*
*४) योजना मासिक जून २०१२*
*५) योजना मासिक जून २०१७*
*६) राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरो अहवाल २०१९*
*७) सांख्यिकीयव कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार*

Copyright © 2020 Authors